कार्यालय नगर पंचायत गोधणी (रेल्वे)

ता.नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर

Email-npgodhanirailway@gmail.com

जा.क्र/न.प.गो.(रे.)/अग्नि.वि/ 185 /२०२६ दिनांक :- 30/ 01 / २०२६

प्रती,

श्री.मेहमुदा शिक्षण व महिला ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था,
नागपूर. इमारत खसरा क्र.७८मौजा गोधनी शिक्षण इमारत खसरा क्र.७८मौजा गोधनी)

विषय- श्री.मेहमुदा शिक्षण व महिला ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था, नागपूर. इमारत खसरा क्र.७८मौजा गोधनी शिक्षण इमारत खसरा क्र.७८मौजा गोधनी)इमारतीचे तात्पुरते अग्निशमन सुरक्षा प्रमाणपत्र चे नियमित नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.

संदर्भ:-1) आपला अर्ज आवक क्र.२२० दिनांक २२/०१/२०२६

महोदय,

वरील विषयांकित संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपण आपल्या विद्यालयाच्या इमारतीस अमेया फायर टेक इंजिनियर, नागपुर यांचे अंकेक्षण अहवाल A-Form नुसार अग्निशमन सुरक्षेची सर्व साधने लावल्यामुळे संदर्भीय अर्जानुसार अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी 11.00 वाजता आपले इमारतीचे निरिक्षण केले असुन त्याकरिता अग्निशमन सुरक्षा बाबतचे खालील अटी व शर्तीवर तात्पुरते अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्राचे नियमित प्रमाणपत्र करण्यात येत आहे.

1) विद्यालयाच्या इमारतीचे उंची पर्यंत चढण्यासाठी व आकस्मित रित्या उतरण्याकरीता अतिदक्षता शिडी नियमित ठेवणे आवश्यक राहील.
2) अधिकृत संस्थेद्वारे माहे जानेवारी ते माहे जुन व माहे जुलै ते माहे डिसेंबर या कालावधी करिता वर्षातुन दोन वेळा प्रत्येक सहा महिण्याच्या कालावधीचे B-Form सादर करने आवश्यक असेल. असे न केल्यास आपणास दिलेले नियमित अग्निशमन सुरक्षा नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.
3) आपल्या विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम हे नकाशा प्रमाणेच होणे आवश्यक आहे.
4) आपल्या विद्यालयाच्या इमारतीचे अधिकृत संस्थेकडुन लेखा अंकेक्षण केले असुन या अनुषंगाने महाराष्ट्र अग्निशमन सुरक्षा व जीव सुरक्षा उपाय अधिनियम 2006 भाग-1 व भाग-2 (MAH III Of 2007) अंतर्भुत असलेल्या अग्निशमन संयंत्र व साधनाचे व्यवस्थापनाची तपासणी दरवर्षी अधिकृत संस्थे कडुन करून घ्यावी व याबाबत नगर पंचायतला सुचित करावे. या कालावधीत आगी सारखी घटना घडली तर होणा-या जीव व वित्त हाणीची जबाबदारी आपली स्वतःची राहील.

5) आपल्या विद्यालयाच्या इमारतीचे महाराष्ट्र अग्निशमन सुरक्षा व जीव सुरक्षा उपाय अधिनियम 2006 भाग-1 व भाग-2 नुसार बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्र व साधनामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास तो तांबडतोब दुरूस्त करून घ्यावा. असे न केल्यास नियमित अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

6) आपणास देण्यात आलेले अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र हे देण्याच्या तारखेपासुन एक वर्षा करीता मान्य राहील. विहीत मुदतीत आपण नुतनीकरण करून न घेतल्यास नियमित अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल. तसेच नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 व महाराष्ट्र अग्निसुरक्षा व जीव सुरक्षा उपाय योजना अधिनियम 2006 कलम (6) व (7) आणी भारतीय उत्स्फोटककायदा दि गॅस सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा 1934 नियम 1976 नुसार आपणावर कार्यवाही करण्यात येईल. यावर आपला कसलाही उजर राहणार नाही.

मुख्याधिकारी

नगर पंचायत सोधनी (रेल्वे)